भिवंडी वाहतूक उपविभाग हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ ११ /२०२६ दि. १२ /०१/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, भिवंडी निजामपुरा महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **भिवंडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने दि. १४/०१/२०२६ रोजी मतपेटया वराळदेवी मंगल भवन येथून भिवंडी शहरात व आसपासचे परीसरात असणाऱ्या मतदान केंद्राकरीता वितरीत केल्या जाणार आहेत. तसेच दि. १५/०१/२०२६ रोजी मतदान प्रक्रीया पार पडल्यानंतर मतपेटया पुन्हा वराळदेवी मंगल भवन येथे जमा करण्यात येवुन दि.१६/०१/२०२६ रोजी सदर ठिकाणी मतमोजणी होणार आहे. त्यामुळे सदर दोन्ही दिवशी वराळदेवी मंगल भवन कार्यालयाचे आसपास वाहतुक कोंडी होण्याची शक्यता आहे. परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	**१)** वराळदेवी सर्कल कडून कामतघर कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **खडी मशीन** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची सर्व प्रकारची वाहने खडी मशीन येथुन वराळदेवी सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**२)** कामतघर कडून वराळदेवी सर्कल कडे येणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **मनोज काटेकर यांचे घराजवळ** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदर सर्व प्रकारची वाहने मानसरोवर तलावास वळसा घेवुन भाग्यनगर – मानसरोवर मार्गे इच्छित स्थळी जातील.
नो पार्किंग –	खडी मशीन ते मनोज काटेकर यांचे घरापर्यंत रस्त्याचे दोन्ही बाजुस **'नो पार्किंग'** करण्यात येत आहे.

सदर अधिसूचना **दिनांक १४/०१/२०२६ रोजी सकाळी ०५:०० वाजेपासुन ते दिनांक १६/०१/२०२५ रोजी मतमोजणी प्रक्रीया पुर्ण पर्यंत** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण.
मा. आयुक्त, भिवंडी निजामपुरा शहर महानगरपालिका, भिवंडी/बृहन्मुंबई
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२/वि.शा. ठाणे.

प्रत कार्यवाहीसाठी :—
प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, भिवंडी
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, भिवंडी/ठाणे.

प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— संबंधित सपोआ वाहतूक विभाग व पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.